दैनिक अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ३२४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१८ फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पनवेल परिसरात दोन वेगवेगळ्या अपघातात १ ठार ३ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात १ ठार व ३ जखमी झाल्याची घटना पनवेल जवळील पळस्पे परिसरात घडली आहे.

पनवेल जवळील पळस्पे येथील शिरढोण गावाच्या हद्दीत असलेल्या साईकृपा हॉटेल जवळ गोवा–मुंबई महामार्गावर ट्रक क्र.एमच–०५–के–९३०९ वरील चालक मासुम नुरमोहम्मद करबेलकर (२७) याने त्याच्या ताब्यातील ट्रक रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने चालवून त्याच्या ट्रकच्या पुढे चालत असलेल्या ट्रेलर क्र.एमएच–४८–एवाय–७०४८ यास पाठीमागून धडक देवून बाजूने देत असलेल्या इको कार क्र.एमएच–०६–सीडी–२३८६ या धडक मारुन झालेल्या अपघातात नितीन भोंगे (२४) व जयराम रावते हे किरकोळ जखमी झाले आहेत. तसेच त्यांच्या ट्रक केबिनमध्ये झोपलेला यशवंत सोनजी फडवले (२७) हा गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. तर दुसऱ्या घटनेत पळस्पे फाटा येथे ट्रक क्र.एमएच–१२–एमएक्स–२३९५ ने एमएच–०१–बीयु–९७७९ या गाडीस धडक दिल्याने या गाडीतील एक जण जखमी झाला आहे.

# जासई-वहाळ हद्दीत शासकीय शेकडो एकर जमिनीवर डेब्रिजचे डोंगर

## दुर्गंधीने नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**दै.रायगड नगरी । उरण**

**मुंबईतील दररोज हजारो टन दुर्गंधीयुक्त घातक कचरा, डेब्रिज उरण परिसरातील जासई–वहाळ–गव्हाण हद्दीत असणाऱ्या सिडको व वनखात्याच्या जागांवर बेकायदेशीरपणे टाकला जात आहे. मृत पशुपक्षी, प्राण्यांचे अवयव मिश्रित कचऱ्याच्या तयार झालेल्या डोंगरामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ पाहत आहे. हा कचरा वायु प्रदुषणणासही कारणीभूत ठरत आहे. कोट्यावधींची उलाढाल असलेल्या या गोरख धंद्याला सिडको व वनखात्याच्या अधिकाऱ्यांच्या वरदहस्तामुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने मात्र नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.**

मुंबईतील हजारो टन डेब्रिज व कचरा काही व्यावसायिक दलालांनी उरण परिसरातील जासई, वहाळ परिसरात टाकण्याची नामी शक्कल लढविली आहे. प्लास्टिक, दुर्गंधीयुक्त घाणीच्या कचऱ्याबरोबरच मुंबईतील इमारतींचे डेब्रिजही या कचऱ्याबरोबर अवजड डंपर्सद्वारे दररोज वाहून आणले जात आहे. दररोज येणाऱ्या हजारो टन कचरा, डेब्रीजमुळे उरण –पनवेल मार्गाच्या बाजूला असणाऱ्या सिडको व वनखात्याच्या जागांवर या कचऱ्याचे भले मोठे जमिनीपासून ५० फुटांपर्यंत डोंगरच निर्माण झाले आहेत. या कचरा डेब्रिजमध्ये गटारातील घाण, मृत पशुपक्षी, प्राण्यांचे अवयवही असल्याने परिसरात जीवघेणी दुर्गंधी पसरत आहे.

यामुळे परिसरातील नागरिक, रस्त्यावरुन वाहतूक करणाऱ्यांना नाक मुठीत धरूनच मार्गक्रमण करावा लागत आहे. या डेब्रिजमध्ये गटारातील घाण, मृत पशुपक्षी, प्राण्यांच्या अवयवांमुळे हवेतही मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असल्याने वायुप्रदुषणात भर पडली आहे.परिसरात वाढते वायु प्रदुषण व दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सिडको व वनखात्याच्या अधिकाऱ्यांच्या वरदहस्तामुळेच परिसरात कचरा, डेब्रिजचे डोंगर निर्माण झाले असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अधिकाऱ्यांच्या अक्षम्य होणाऱ्या दुर्लक्षाबाबत मात्र नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

> या गंभीर प्रश्नावर चौकशी करून तत्काळ कारवाई करण्यासाठी रायगड जिल्हापरिषद, नवी मुंबई पोलिस, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला कळविण्यात येईल.
>
> **राहुल मुंडके, उपजिल्हा अधिकारी**

> डेब्रिज, कचरा टाकण्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाची चौकशी करून कारवाई केली जाईल.
>
> **सचिन आडकर, उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ**

मुंबईतून येणारा हा कचरा या दलालांना अगदी मोफत दिला जातो. मुंबईतील कचरा उचलणारे ठेकेदार या कचऱ्याचा कोणताही मोबदला न घेता तो या दलालांना आणून देतात.त्यात अनेक प्रकारच्या घातक कचऱ्याबरोबर मानवी अवयवही असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उरण परिसरात भरवाची कामे केली जातात. ती कामे करणारे ठेकेदार दगड मातीचा भराव न करता स्वस्तात मिळणाऱ्या या कचऱ्याचा भराव करून संबंधित कंपनीकडून लाखो रुपये कमावतात.

या डेब्रिज कचऱ्याच्या भरावामुळे पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होत असताना संबंधित शासकीय यंत्रणा त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने या गोरख धंद्यावर कारवाई करणार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे. या डेब्रिज, कचऱ्याच्या धंद्यामुळे धनवान झालेले दलाल शासकीय यंत्रणा खिशात असल्याने कोणी काही वाकडे करू शकत नाही अशी मस्तवाल भाषा करू लागल्याने सध्या तरी शासकीय नियमांचाच कचरा झाल्याचे चित्र दिसू लागले आहे.

## अखेर कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक तीनची उंची वाढविण्याच्या कामाला सुरुवात

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत** : कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक तीनची उंची वाढविण्यात यावी. अशी मागणी प्रवासी वर्गाकडून सातत्याने होत होती. याबाबतीत सामाजिक कार्यकर्ते व रेल्वे प्रवाशांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणाऱ्या पंकज ओसवाल यांनी सातत्याने गेले दहा महिने पाठपुरावा केला. यावेळी प्रशासनाने तारीख पे तारीख देऊन काम केले नाही. त्यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला.अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आणि आता फलाट तीनची उंची वाढविण्याचे काम सुरू केले आहे.



कर्जत रेल्वे स्थानकात एकूण तीन फलाट व ईएमयु फलाट आहे परंतु फलाट क्रमांक तीन वरची उंची कमी असल्यामुळे लोकल किंवा एक्सप्रेस ट्रेन मध्ये चढतांना खूपच गैरसोय होत असे. फलाट आणि गाडी च्या दरवाज्या मध्ये खूपच अंतर असल्याने एखादा प्रवासी दोघांच्या मध्ये अंतर असल्या कारणाने पडून जखमी होऊ शकतो. या बाबतीत प्रवाशी वर्गाने सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांच्या लक्षात ही बाब आणून दिली. ओसवाल यांनी ८ एप्रिल २०२१ पासून पाठपुरावा सुरू केला. त्याची दखल घेत १९ एप्रिल २०२१ रोजी रेल्वे प्रशासनाने त्यांना कर्जत येथील फलाट क्रमांक तीन वरील उंची वाढविण्याच्या बाबतीत कल्याण व लोणावळा येथील रेल्वे अधिकाऱ्यांनी कर्जत येथे येऊन फलाट क्रमांक तीनची पाहणी केली व त्यांना समस्येचे गांभीर्य लक्षात आले.

ओसवाल यांनी पुन्हा रेल्वे प्रशासनाकडे कर्जत रेल्वे .../२

## पनवेलमध्ये रंगला रंगछटा २०२२ चा दिमाखदार सोहळा

### ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांची विशेष उपस्थिती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथे चित्रपट सृष्टीचे जनक स्वर्गीय दादासाहेब फाळके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जे.एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था आणि रिफ्लेक्शन थिएटर, पनवेल आयोजित रंगछटा २०२२ एकपात्री व द्वीपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते तथा जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे उपस्थित होते. तसेच स्पर्धकांचे मनोबल वाढविण्यासाठी व मार्गदर्शन देण्यासाठी मराठी सिनेसृष्टीचे ज्येष्ठ रंगकर्मी, सिनेअभिनेते जयंत सावरकर हेही उपस्थित होते. प्रथम सत्रात नटराज पूजन व दीपप्रज्वलन याने सुरुवात करून प्रितम म्हात्रे व जयंत सावरकर यांनी स्पर्धकांना मोलाचे मार्गदर्शन देऊन स्पर्धकांचा उत्साह वाढवला.



या स्पर्धेसाठी स्पर्धकांचा उत्तम असा प्रतिसाद लाभला. स्पर्धेमध्ये एकूण ४५ स्पर्धकांनी भाग घेतला होता व या स्पर्धे साठी लाभलेले परीक्षक म्हणजेच विनय जोशी व मनोहर लिमये यांनी स्पर्धे चे परीक्षण केले. स्पर्धेमध्ये एकूण १६ बक्षीस देण्यात आले. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यामध्ये सिनेअभिनेते जयंत भालेकर, सिनेअभिनेते शेखर फडके, लेखक सिद्धार्थ साळवी, सिनेअभिनेते विजय पवार, स्वराज्य चित्रपटाचे दिग्दर्शक लेखक विहार घाग व बाल नाट्य निर्माते गायधनी हे सुद्धा उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. रंगछटा २०२२ या स्पर्धेचे एकपात्री अभिनय स्पर्धे चे प्रथम पारितोषिक स्वप्नील साळवी, द्वितीय पारितोषिक परेश राजश्री, तृतीय पारितोषिक स्वप्नील रसाळ, उत्तेजनार्थ ऋतुजा, अजिंक्य टेकाले, शिवदास कुमटे, कल्याणी म्हात्रे, .../२

## संक्षिप्त...

### सुधीर जोशी यांचे निधन



**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेनेचे जेष्ठ नेते सुधीर जोशी यांचं आज ( गुरुवारी) निधन झालं आहे. ते ८१ वर्षाचे होते. शिवसेनेच्या जडणघडणीमध्ये सुधीर जोशी यांचा मोठा वाटा होता. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अतिशय जवळचे विश्वासू म्हणून त्यांची ओळख होती.

मागील काही दिवसांपासून सुधीर जोशी यांची प्रकृती खालवली होती. त्यांना कोरोनाचा संसर्गही होऊन गेला होता. सुधीर जोशी यांच्यावर मुंबईतल्या जसलोक हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. नुकतेच कोरोनाच्या आजारातून घरी परतले होते. त्यानंतर त्यांची प्रकृती पुन्हा खालावली होती. सुधीर जोशी हे शिवसेनेचे मुंबईचे दुसरे महापौर होते. पहिल्या युतीच्या सरकारमध्ये त्यांनी महाराष्ट्राचे कॅबिनेटपदही भूषावले आहे. त्यांनी महसूलमंत्री म्हणून काम काम पाहिले आहे. १९९९मध्ये सुधीर जोशी यांनी आजारपणामुळे सक्रीय राजकारणातून निवृत्ती घेतली होती.

## किरीट सोमय्यांविरोधात रायगडमध्ये शिवसेना आक्रमक

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोर्लई या गावात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे याच्या नावे १९ बंगले असल्याच्या आरोप भाजपाचे नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. त्यानंतर सजंय राऊत यांनी कार्लई येथे बंगले असल्याचे आरोप फेटाळून लावले आणि तेथे बंगले असतील तर राजकारण सोडून देईन, असे वक्तव्यही त्यांनी केले. मात्र, मुरुड तालुक्यातील कोर्लई येथे जाऊन सरपंच प्रशांत मिसाळ यांना याबाबत विचारले असता कोर्लई येथे रश्मी ठाकरे यांनी घेतलेल्या जमिनीवर कोणतेही बंगले नसल्याचे ते म्हणाले. तसेच रश्मी ठाकरे यांनी कोणताही माफिनामा लिहून दिलेला नसल्याचेही त्यांनी सांगितले.

मात्र, जर बंगले नाहीत तर मग बंगल्यांचा कर कसा भरला जातो, याचा अर्थ बंगले चोरीला गेले का?, असा खोचक सवाल किरीट सोमय्या यांनी केला. उद्या शुक्रवारी किरीट सोमय्या रायगड मधील रेवदंडा पोलीस स्टेशनसह अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात येणार असल्याने रायगड जिल्ह्या–तील शिवसेनेच्या तीनही आमदारांनी पत्रकार परिषद घेऊन



किरीट सोमय्या यांच्या अलिबाग दौऱ्यावेळी शिवसेना आक्रमक असल्याचे सांगितले. पत्रकार परिषदे मध्ये सेनेचे अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, महाडचे आमदार भरत गोगावले, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी पत्रकार परिषद घेतली. किरीट सोमय्या हे अलिबागचे जावई आहेत, जावयांना परत पाठवणे आम्हाला माहीत आहे, असे वक्तव्य आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे. किरीट सोमय्या विरोधात शिवसेना आक्रमक असल्याचे सांगून किरीट सोमय्या यांना एक प्रकारे उद्याच्या अलिबाग दौऱ्याआधी ईशारा दिला असल्याचे बोलले जात आहे.

## दोन लाखासाठी एका इसमाचे अपहरण करणाऱ्या सहा जणांना पनवेल शहर पोलिसांनी केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेसीबी घेण्यासाठी दिलेले दोन लाख रुपये परत देत नव्हता. तसेच सदर वाहन सुद्धा देत नसल्याने रागाच्या भरात सहा जणांनी पनवेल येथून एका इसमाचे अप–हरण केले. परंतु या संदर्भात तक्रार दाखल होताच पनवेल शहर पोलिसांनी अवघ्या दोन तासात सदर सहा आरोपींची माहिती घेवून अपहरण केलेल्या इसमाला सुखरुपपणे शोधून काढले आहे.

ज्ञानेश्वर जाधव (३० रा.औरंगाबाद) व त्याचा सहकारी अपहरण झालेला रवि नांगडे (३० रा.औरंगाबाद) यांनी आमच्याकडे पनवेल येथे विकण्यासाठी जेसीबी पोकलन असल्याचे बीड येथील काही जणांना




सांगितले. त्यानुसार त्यांच्याकडून सदर जेसीबी व पोकलन घेण्यासाठी २ लाख रुपये आगावू रक्कम घेतली. त्यानंतर बीड येथील या व्यक्तीने सदर वस्तू कधी देतो यासाठी त्याच्याकडे पाठपुरावा केला असता या दोघांनी वेळकाढूपणाचे .../२

## देशातील पहिल्या वॉटर टॅक्सीसेवेचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शुभारंभ

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

देशात पहिली रेल्वे सेवा मुंबई– ठाणे दरम्यान सुरु झाली. त्यानंतर देशात त्याचे जाळे विस्तारले. मुंबईतून जी सुरुवात होते त्या सुविधांचा प्रसार आणि अनुकरण संपूर्ण देशात होते हे आजवर दिसून आले आहे. आज देशातील पहिल्या वॉटर टॅक्सी सेवेचा शुभारंभही मुंबईतून होत आहे याचा अभिमान असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बेलापूर जेट्टी आणि बेलापूर मुंबई वॉटर टॅक्सी सेवेच्या उद्घाटन प्रसंगी काढले.

महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत बेलापूर येथून सुरू करण्यात आलेल्या वॉटर टॅक्सीचा शुभारंभ आणि बेलापूर जेट्टीच्या उद्घाटन सोहळ्यास मुख्यमंत्री श्री. ठाकरे, केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल दुरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी



झाले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, नगरविकास मंत्री तथा ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, बंदरे विकास मंत्री अस्लम शेख, राज्यमंत्री अब्दुल सत्तार, खासदार राजन विचारे, आमदार रविंद्र फाटक, मंदा म्हात्रे,मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष राजीव जलोटा, मेरी टाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी, ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्यासह वरिष्ठ शासकीय अधिकारी आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, आजचा दिवस महत्वाचा असून देशातील पहिली वॉटर टॅक्सी महाराष्ट्रात सुरु होत आहे. मुंबईतून सुरू झालेल्या सेवेचे अनुकरण देशभर केले जाते हे मुंबई ठाणे दरम्यानच्या पहिल्या रेल्वेसेवेवरून दिसून आले आहे. जलवाहतुकीच्या या सेवेचे देखील देशात अनुकरण केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी समुद्रावर हुकूमत असली पाहिजे या भावनेने त्याकाळात कल्याणमध्ये आरमाराची बांधणी केली, तेंव्हापासूनच या परिसराचे महत्व अधोरेखित झाले. त्यानंतर इंग्रजांनी रेल्वे आणली. आपल्याकडील साधनसंपत्तीचे महत्व आपण किती ओळखतो आणि त्याचा जनतेला .../२

# म्हसळा तालुका शिवसेना पाठोपाठ भाजपलाही खिंडार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

तालुक्यातील ग्रामीण भागाचा विकास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच करू शकतो असा दृड विश्वास झाल्याने रेवळी गावच्या माजी सरपंच तथा तालुका भाजपच्या महिला अध्यक्षा मीना टिंगरे,भाजपचे ता.उपाध्यक्ष अनिल टिंगरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.दोनच दिवसांपूर्वी तीराडी विकास मंच ग्रामस्थांनी,शिवसेना म्हसळा तालुका माजी तालुका प्रमुख तथा माजी सभापती महादेव पाटील यांनी पक्षांतर केले होते



आज भाजपचे तालुका पदाधिकारी टिंगरे दांपत्यानी रेवळी गाव आणि पंचक्रोशीचा विकास करण्यासाठी खासदार सुनिल तटकरे यांचे उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.सुतारवाडी येथे झालेल्या पक्ष प्रवेश कार्यक्रमात खासदार सुनिल तटकरे यांनी टिंगरे दांपत्याचे पक्षात स्वागत केले.या वेळी खासदार तटकरे यांनी रेवळी,बनोटी,गणेशनगर येथील गावांचे विकास कामांना प्राधान्य देण्यात येईल तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पदाधिकारी म्हणून मानाचे स्थान देण्यात येईल असे आश्वाशीत केले.पक्ष प्रवेश कार्यक्रमाला सभापती छाया म्हात्रे,उपसभापती संदीप चाचले,माजी सभापती महादेव पाटील,राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक अध्यक्ष फैसल गीते,प्रकाश गाणेकर उपस्थित होते.

**Government of Maharashtra**

**Range Forest Office Phansad (Wildlife) Sanctuary**

At.New Mazgaon (Kasgaon), Post-Mazgaon, Tal-Murud-Janjira, Dist-Raigad
Email : rfophansad@gmail.com

## Tender Notice No.04/2021-22

**Range Forest Officer-Phansad (Wildlife) Sanctuary invites proposals from interested Civil Contractors to participate in the competitive bidding process of B-1 Tendering to-**

| Sr.No. | Work Description | Work Cost |
|---|---|---|
| 1 | Special Repairs to Rest House at Supegaon Campus (PWS) Tal-Murud | 260583/- |

B-1 Tender submission would be offline and the deadline to submit the proposals is 24/02/2022 at 5.00 PM. only.

(Blank B-1 Tenders forms are available at Range Forest office Phansad for Rs.250/- each (12% GST Extra) From 10.00 AM On 18/02/2022 to 24/02/2022 up to 3:00 PM.)

**Sd/-**
**Range Forest Officer**
**Phansad (Wildlife) Sanctuary**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## फलाट क्रमांक तीनची उंची वाढविण्याच्या कामाला सुरुवात

स्थानकातील फलाट क्रमांक तीनची उंची वाढविण्याचे काम केव्हा सुरू करणार? याबद्दल पुन्हा दिनांक ४ जून २०२१ ला विचारणा केली असता. रेल्वे प्रशासनाने फलाट क्रमांक तीनची उंची वाढविण्याचे काम सप्टेंबर २०२१ मध्ये सुरु करणार असल्याचे लेखी उत्तर दिले परंतु सप्टेंबर २०२१ संपून गेला तरी सुद्धा काम न सुरू केल्याने ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाशी पुन्हा पाठपुरावा केला असता रेल्वे प्रशासनाने सदर कामाचे कार्यादेश काढली असून ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत काम पूर्ण केले जाईल असे पंकज ओसवाल यांना ३ ऑक्टोबर २०२१ ला कळविले होते. खरे तर तारीख पे तारीख देऊन सदर काम ३१ डिसेंबरमध्ये सुध्दा न झाल्याने पुन्हा पत्र व्यवहार केला. असता सदर काम ३१ जानेवारी पर्यंत पूर्ण होईल. असे रेल्वे प्रशासनाने ओसवाल यांना कळविले मात्र आता सदर कामाला रेल्वे प्रशासनाने सुरवात केली आहे.

## पनवेलमध्ये रंगला रंगछटा २०२२ चा दिमाखदार सोहळा

वैष्णवी पाटील व लक्षवेधी एकपात्री सिद्धी पवार यांना देण्यात आले. द्विपात्री अभिनय स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक अक्षता साळवी व रसिका पवार, द्वितीय पारितोषिक स्वप्निल बनकर, सिद्धेश शिंदे व तृतीय पारितोषिक यश खाडे, ग्रंथा घाग, उत्तेजनार्थ आंचल जैन, सिद्धेश शिंदे, स्वप्नील बनकर, ग्रंथा घाग, द्विपात्री विनोदी अक्षता साळवी द्वीपात्री लक्षवेधी दिया राणे यांना देण्यात आले. या कार्यक्रमाला शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, मा.उपनगराध्यक्ष गणेश पाटील, गझलकार ए. के.शेख, पनवेल अर्बन बँक संचालिका माधुरी गोसावी, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकार, नगरसेविका प्रीती जॉर्ज, नगरसेविका सारिका भगत, मा.नगरसेवक डी. पी म्हात्रे, सामाजिक कार्यकर्त्या सुजाता ठक्कर, युवक संघटना अध्यक्ष देवेंद्र पाटील, अनिल बंडगर, पत्रकार मंदार दोंदे, सोनवणे सर, डी. एन यादव, किरण घरत, संजय कदम, विजय पवार, हरीश मोकल, संदेश मोहन, मंगेश अपराज, योगेश कोठेकर, रोहन गावंड, वैभव जोशी, सिद्धांत साखरे, पंकज वाघ, नाना रणदिवे, वरून महागावकर तसेच पत्रकार बंधू भगिनी व प्रेक्षक उपस्थित होते. पनवेल-उरण मधील कलाप्रेमींसाठी ही एक सुरुवात आहे या पुढेही असे उपक्रम आम्ही जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून सुरू ठेवणार आहोत , जेणेकरून पनवेल उरण मधील तरुणांना एक व्यासपीठ त्यांच्याच विभागात उपलब्ध होईल अशी आमची अपेक्षा आहे हे विरोधी पक्षनेते श्री.प्रितम म्हात्रे म्हणाले.

## सहा जणांना पनवेल शहर पोलिसांनी केले गजाआड

धोरण अवलंबविले. अखेरीस त्यांना पनवेल येथून बोलावून अपहरण झालेला रवि नांगडे यांनी त्या सहा व्यक्तींना पनवेल शहरात ठिकठिकाणी फिरविले परंतु वस्तू देण्यास टाळाटाळ केल्याने अखेरीस त्रस्त झालेल्या या सहा व्यक्तींनी त्यांच्याकडे असलेल्या स्कॉर्पिओ गाडीमध्ये त्याला घालून पुणे बाजूकडे त्याला घेवून गेले व त्याचा सहकारी ज्ञानेश्वर जाधव याला फोन करून आमचे पैसे २ लाख रुपये आणून दे व तुझ्या सहकाऱ्याला घेवून जा असे सांगितले.

यावेळी ज्ञानेश्वर जाधव यांनी तात्काळ आपल्या सहकाऱ्याचे अपहरण झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करताच वपोनि विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जोशी, पो.उप.निरीक्षक अभय शिंदे, पो. हवा.रवींद्र राऊत, पोना परेश म्हात्रे, पोना वायकर, पोना पारासूर, पोना देशमुख, पो.ना.संजय सावंत, विवेक पारासुर, गथंडे आदींच्या पथकाला तांत्रिक तपासाद्वारे व गुप्त बातमीदाराद्वारे सदर इसमाला तळेगाव दाभाडे परिसरात घेवून गेल्याची त्यांना माहिती मिळाल्याने त्यानुसार सदर पथकाने त्या ठिकाणी जावून सापळा रचून या सहा जणांना ताब्यात घेवून अपहरणकर्त्याची सुटका केली आहे व त्यांच्या विरुद्ध भादवी कलम ३६५, ३८४ आदींसह इतर कलमाद्वारे कारवाई करण्यात आली आहे.

## देशातील पहिल्या वॉटर टॅक्सीसेवेचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शुभारंभ

किती उपयोग करून देतो याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. विकासात दळणवळणाची सेवा महत्वाची भूमिका बजावते. रस्ते, पूल, रेल्वे, मेट्रो, भुयारी रेल्वे यामध्ये आधुनिकीकरणाची कास धरत आज वॉटर टॅक्सी सुरु झाली. नवी मुंबईला मुंबईशी आणि एलिफंटा लेण्यांना जोडणारी ही जलवाहतूक सेवा सामान्य नागरिकांना फायदेशीर ठरेल, असे त्यांनी सांगितले. समुद्राचा उपयोग जलवाहतुकीसारख्या प्रकल्पांसाठी वाढला पाहिजे. येत्या समुद्राचे पाणी पिण्यायोग्य करण्यासंदर्भातील प्रकल्प प्रगतीपथावर असून हा क्रांतिकारक टप्पा असेल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री श्री सोनोवाल म्हणाले, सागर किनारपट्टी जिल्ह्यात सागरमाला प्रकल्पांतर्गत विविध पायाभूत सुविधांचे काम सुरु आहे. यातून सागरतटीय जिल्ह्यातील लोकांना उत्तम सेवा देण्याचा प्रयत्नआहे. यातून रोजगार निर्मिती करून आर्थिक विकासाचे चक्र गतिमान करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.कोरोना काळातही बेलापूर जेट्टीचे काम सुरु राहिले. नवी मुंबई ते दक्षिण मुंबईला जोडणाऱ्या या जलवाहतूक सेवेमुळे प्रवाशांचा वेळ वाचण्यास मदत होईल. रस्त्यावरची वाहतूक कोंडी कमी होईल. आणखी काही जेट्टी मुंबई हार्बर भागात प्रस्तावित आहेत. मुंबई ते अलिबाग रो रो सेवा सुरु झाली आहे. वॉटर टॅक्सीला मिळणारा प्रतिसाद पाहून जलवाहतूकीसाठी अतिरिक्त जेट्टीचे बांधकाम केले जाईल. केंद्रीय नौवहन मंत्रालयाकडून बंदर विकास, मत्स्यव्यवसाय विकास, जेट्टीचे निर्माण, कौशल्य विकास अशा विविध प्रकल्पांवर काम सुरू आहे. सागरमाला कार्यक्रमातून जलद आर्थिक विकासाला चालना देण्यात येत आहे. १.०५ लाख कोटीचे १३१ प्रकल्प महाराष्ट्रासाठी निश्चित करण्यात आले आहेत. यात सागरमाला कार्यक्रमांतर्गत ४६ प्रकल्पास २७८ कोटीचे वित्तीय सहाय्य देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. पालघर, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील मासेमारी करणाऱ्या बांधवांच्या सक्षमीकरणाचे काम करण्यात येत असल्याचे सांगतांना त्यांनी ससुन डॉकसह सिंधुदूर्ग आणि रायगडच्या बंदरांच्या आधुनिकीकरणासाठी काम सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, मुंबई महानगरच्या परिवहन सेवेच्या विकासासाठी शासन मागील दोन वर्षांपासून काम करत आहे. चक्रीवादळ, अतिवृष्टीसारखे नैसर्गिक संकट आले, कोरोना सारखे संकट आले, पण या अडचणीतून विकासकामांना गती देण्याचे काम शासनाने केले. मेट्रो , मोनो नंतर जलवाहतूक प्रकल्प आज सुरु होत आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगडकरांसाठी आजचा दिवस अभिमानाचा असल्याचे त्यांनी सांगितले. गेट वे ऑफ इंडियाजवळ केंद्र शासनाच्यातर्फे आणखी एक प्रकल्प प्रस्तावित आहे. तो लवकर सुरु व्हावा यासाठी सर्व मिळून प्रयत्न करूया, असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले. जलवाहतुकीमुळे नवी मुंबई, ठाणेकरांना लाभ जलवाहतूक ही सर्वात स्वस्त वाहतूक आहे. दाट लोकवस्ती असलेल्या ठाणे, नवी मुंबईकरांना याचा लाभ होईल. यामध्ये पर्यावरणाचाही विचार आहे. सर्व मिळून या कामांना गती देऊ या. आज चार मार्गावर जल टॅक्सी सेवा सुरु होत आहे. प्रवाशांचा वेळ, पैसा, श्रम तर यामुळे वाचेलच परंतु प्रदुषणालाही आळा बसेल, असे श्री. पवार यावेळी म्हणाले. एमएमआरक्षेत्राला लागून खाडी आहे त्यामुळे जलवाहतूकीला चालना देऊन या सुविधेचा लाभ घेता आला पाहिजे. सुरक्षित प्रवासाला चालना देत ही जलवाहतूक सेवा सुरु केली तर प्रवाशांनाही सुलभ सुविधा उपलब्ध होईल. पायाभूत सुविधांसाठी निधी देण्यासाठी मुख्यमंत्र्यांचा आग्रह असतो असेही उपमुख्यमंत्री यावेळी म्हणाले. महाराष्ट्राच्या भल्यासाठी सगळे मिळून काम करू असे आवाहनही त्यांनी केले. मेट्रो चे काम पूर्ण झाले, जलवाहतूक सुरु झाली तर एमएमआरचे रुप एकदम पालटलेले दिसेल असेही ते म्हणाले. महाराष्ट्र सागरी मंडळाला (महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड) २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या चित्र प्रदर्शनाचे, तिकीट काऊंटरचे उदघाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. वॉटर टॅक्सीला ध्वजांकन करून उपमुख्यमंत्री श्री.पवार, मंत्री श्री. शेख आणि अधिकारी त्याच वॉटर टॅक्सीतून मुंबईकडे रवाना झाले. जलवाहतूक सेवा उपलब्ध करून देणाऱ्या कंत्राटदारांचा यावेळी उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.






मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदाराचे वकील : सुशांत बालाजी पुरी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.प्रधान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी संकीर्ण चौकशी अर्ज क्र.१८२५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.३१/३/२०२२

श्रीमती.रुची नितीन सिन्हा वगैरे २ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) सदरील अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ यांची सख्खी आई आहे. अर्जदार हे शिर्षक कलमातील पत्यावरील कायमचे रहिवासी आहेत. अर्जदार क्र.१ यांनी स्वतःकरिता आणि अर्जदार क्र.२ ही अज्ञान असल्याने तिची पालनकर्ती आई म्हणून अर्जदार क्र.१ यांनी हा अर्ज दाखल केलेला आहे.

२) अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ यांचे पिता श्री.नितीन धिरेंद्र सिन्हा यांचे दि.१२ मे २०२१ रोजी अर्जदार यांचे शिर्षक कलमातील पत्यावर निधन झाले आहे.

३) कै.नितीन धिरेंद्र सिन्हा यांच्या मालकीच्या स्थावर मिळकती आणि बँक खात्यामधील सर्व ठेवी या स्थावर व जंगम मिळकतीस सदरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. असे घोषित करून मिळण्यासाठी तसेच सदरील बँक खात्यातील रक्कम मिळणेकरिता सदरील अर्जदार या मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

४) सदरील अर्जदार क्र.१) श्रीमती.रुची नितीन सिन्हा २) कुमारी.अदिती नितीन सिन्हा याच कै.नितीन धिरेंद्र सिन्हा यांचे वारस आहेत. तसेच भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस दाखल्यासाठी अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.१०/०२/२०२२ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्या मिळकतींसमोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे अशिल हे सदरची मिळकत कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नाव | गट क्रं. उपविभाग क्रं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.जाफर पीर मोहम्मद शेख | ५८/२/४/५/ब | ०-१३-१८<br>पो.ख. ०-०२-३२<br>०-१५-५० | २.३३ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची वर नमूद विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस, दावा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबधं असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१७/२/२०२२

**सही/-**
**एन.ए.शेख**
**वकील व नोटरी**
**शॉप नं.२४, अमन सोसायटी,**
**सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई**
**मो.नं.९९२०९९६९०९**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नेरे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) रमेश भागा फडके<br>२) चंद्रकांत भागा फडके<br>३) रंजना संतोष दरे<br>४) ज्योती रघुनाथ शेळके<br>५) रुपेश रघुनाथ शेळके<br>६) जगदीश रघुनाथ शेळके | २४१ | ०-३१-९० | ६.१९ |

तरी वर वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे जमीन मालकांनी आमच्या अशिलांना विकलेली आहे व आमचे अशिलांनी सदर मिळकत विकत घेण्यासाठी मिळकतीचा मालकाबरोबर बोलणी केलेली आहे.

तरी सदर मिळकतीसंबंधी कोणाही व्यक्तींचा अथवा व्यक्तीचा अथवा कोणतेही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी साठेकरार कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा, हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणताही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती आणि त्यांच्या हरकतीत नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष येवून अथवा रजि. पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे कळावे.

दि.१७/२/२०२२

**सही/-**
**श्री.अरविंद चामले**
**ॲडव्होकेट व नोटरी भारत सरकार**
**ऑफिस :- ११, स्नेह सदन,**
**गडकरी पथ, पनवेल, जि.रायगड**
**फोन नं.२७४५६१७८**
**(मो) ९८६९५५१७८५**


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


राव सो
ॲड.रेखा होवाळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर पनवेल
वारसाचे सर्टीफिकेट मिळणेबाबत अर्ज
अर्ज क्र.१४१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

१) श्री.निक्सॉन मायकल राज
वय : ५०
२) कु.कॅथरिन निक्सॉन राज
दोघेही रा.विवेक को.ऑप.हौ.सो.,
बी-१३, सेक्टर-९ ए, प्लॉट नं.४१, वाशी नवी मुंबई — अर्जदार
विरुद्ध
गॅब्रियल निक्सॉन राज
रा.दोघेही रा.विवेक को.ऑप हौ.सो.,
बी-१३, सेक्टर-९ ए, प्लॉट नं.४१, वाशी नवी मुंबई

ज्यापेक्षा कै.श्रीमती.Late Smt.Massila Tamil Selvi Nixon ह्यांचा मृत्यू दि.११/०६/२०२१ रोजी वाशी येथे झाला आणि अर्जदार हे कै. Late Smt.Massila Tamil Selvi Nixon यांचे पती व अर्जदार नं.२ ही मुलगी आहे व सामनेवाला हा मुलगा आहे. आणि वारस या नात्याने मयताचे मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दाखल केला.

SHEDULE OF PROPERTY 'A'

Name of the Property Holder : Late Smt.Massila Tamil Selvi Nixon.
Flat No.701, Plot No.12 B, Sector-8, Building known as Shelter Complex CHS. Kharghar Tal-Panvel, Dist-Raigad admeasuring area 46.47 Sq Mt, Agreement value Rs.40,00,000/- (Forty Lakhs Only)

वारसाने सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारसदार नव्हे, असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध तारखेपासून एक महिन्याचे आत, ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखी नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदर यांचे मुजरात वारसाचे सर्टीफिकेट देईल.

तारीख ०९ माहे ०२ सन २०२२ बेलिफाकडे

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.पांडे साहेब यांचे कोर्टात
ॲड.प्रदीप भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्र.१९०/२०२२
ने.ता.१५/३/२०२२

श्री.भिका दुनकूर केणी
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.पेठाली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.निबंधक,
मे.पनवेल महानगरपालिका
प्रभाग समिती-अ, खारघर विभाग,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई मयत रंगुबाई दुनकूर केणी या दि.२०/१२/१९७९ रोजी मौजे : पेठाली, तळोजा पाचनंद विभाग, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झाल्या आहेत. तथापि अनावधानाने मयत रंगुबाई दुनकूर केणी यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत पनवेल महानगरपालिका कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत रंगुबाई दुनकूर केणी यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हे सर्व कळावे.

ही नोटीस आज रोजी दि.१७/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

### सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.यशवंत गोपाळ सकपाळ, रा.चौक, तालुका : खालापूर, जि.रायगड असून खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही आमचे अशिलांचे कुळ या नात्याने ताबा कब्जा वहिवाटीत पुर्वापारापासून आज रोजी पर्यंत आहे. सदर मिळकतीचे सातबारा उताऱ्याचे कुळ व खंड सदरी आमचे अशिलांचे वडील कै.गोपाळ बाबाजी सकपाळ यांच्या नावाची नोंद आहे. सदर खाली नमूद शेतजमिनी मध्ये आमचे अशिलांचे कुळ या नात्याने हक्क हितसंबंध असून सदर शेतजमीन मिळकत आमचे अशिलांचे ताबा कब्जा वहिवाटीत आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खाली नमूद केल्यानुसार आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चौक-मानिवली, ता.खालापूर, जि.रायगड**

| मौजे | गट नं. / सर्व्हे नं. | उपविभाग / हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौक मानिवली | ४८ | २ | १-०१-००<br>पो.ख. ०-४५-००<br>१-४६-०० | १.३७ |

वर नमूद मिळकती बाबत कर्जत येथील मा.उपविभागीय अधिकारी कर्जत यांचे कोर्टात आर.टी.एस. अपिल क्र.२/२०२२ या क्रमांकाचे अपिल आमचे अशिलांनी दाखल केले असून सदर अपिल पुढील सुनावणीकरिता मा.न्यायालयात प्रलंबित आहे. माझे अशिलांस असे खात्रीलायकरित्या कळले आहे की, वर नमूद शेतजमिनीचे मालक मयत असून त्यांचे वारस सदर वर नमूद मिळकत त्रयस्थ इसमांस विकण्याचे तयारीत आहेत.

तरी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, वर नमूद शेतजमिनीमध्ये आमचे अशिलांचे कुळाचे हक्क हितसंबंध असून सदर मिळकत आमचे अशिलांचे ताबा कब्जा वहिवाटीत व कसवणुकीत आहे. तसेच वर नमूद मिळकतीबाबत मा.उपविभागीय अधिकारी कर्जत येथे आर.टी.एस. अपिल ०२/२२ प्रलंबित असल्याने सदर मिळकत ही न्यायप्रविष्ट आहे. सबब सदर मिळकती संदर्भात कोणीही, कसल्याही प्रकारची खरेदी विक्री किंवा तत्सम कोणताही व्यवहार कोणत्याही इसमांसोबत करू नये.

वरीलनुसार सावधान नोटीस दिल्यानंतर देखील कोणीही सदर दावा मिळकती संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास त्यापासून होणाऱ्या परिणामाकरिता व नुकसानीकरिता अशी व्यक्ती स्वतः जबाबदार राहील. तसेच आमच्या अशिलांचे होणाऱ्या नुकसानीकरिता देखील सदर व्यवहार करणारा त्रयस्थ इसम जबाबदार राहील. तसेच सदरचा इसम फौजदारी व दिवाणी कारवाईस पात्र राहील आणि सदर बाबतची कसलीही जबाबदारी आमच्या अशिलांवर राहणार नाही, याची नोंद तमाम जनतेने घ्यावी.

दिनांक : १७/०२/२०२२
पनवेल

**सही/-**
**ॲड.मनिष रविंद्र बोहरा**
**१०४, १४२ ए, एम.सी.सी.एच. सोसायटी,**
**पहिला मजला, युनियन बँक ऑफ**
**इंडियाच्या वरती, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९८१९३१३३२५**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## गुंज संस्थेच्या वतीने भापट येथे किट वाटप



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील अतिदुर्गम भागातील भापट या गावी गुंज संस्थेच्या वतीने किट वाटप करण्यात आले.

गुंज संस्था हि महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात कार्यरत आहे. या संस्थेचे पाच जिल्ह्यांचे प्रमुख अविनाश चव्हाण, कार्यवाहक प्रतिनिधी मयुर मारूती नात्ती यांनी भापट ग्रामस्थ यांच्या जवल संपर्कात येऊन संस्थेची ध्येय आणि उद्दिष्टे समजावून सांगितली . या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली गावातील सामाजिक, आवश्यक कामे लोकसहभागातून केल्या ने संस्था जीवनावश्यक वस्तूरूपात सहकार्य करते. या तत्त्वावर भापट ग्रामस्थ व महिला यांनी या ठरावावर एक मत करून पुढील वाटचालीसाठी भापट ग्रामस्थ यांनी एक हात सहकार्याचा या भूमिकेतून पाऊल उचलले. भापट गावासमोर अनेक कामांचा विषय चर्चेचा होता. पाणी अडवा पाणी जिरवा– बंधारा बांधणे, अंतर्गत रस्ते दुरुस्ती, स्मशान भूमी स्वच्छता ठेवणे, वाहतुकीची रस्ता अशा कामांपैकी प्रथम दळणवळणासाठी असणारा रस्ता हा १ कि.मी. दगड, माती भराव टाकून लोकसहभागातून गुंज संस्थेच्या माध्यमातून सुव्यावस्थित करण्यात आला. यासाठी महिला व पुरुष यांनी एकजूटीने सहकार्य केले. व सर्व समाज एकत्रीत येऊन श्रमदान केले. आणि सदर रस्त्याबाबत दळणवळण साठी मार्ग सुख सोईचे झाले यासाठी भापट गाव विकास समिती अध्यक्ष प्रविण ठोंबरे, सेक्रेटरी जयसिंग बेटकर, सदस्य लक्ष्मण मोहिते, गजानन पाष्टे, पांडुरंग जाडे, दिलिप गावडे, मोहन भोसले, सत्तार नजिर, रूपेश घडशी, वंदना मोहिते, कोमल मोहिते, राजेश्री बेटकर, रंजिता कुवारे, द्रष्टी अलिम, रूतुजा भोसले, यासाठी गुंज संस्थेचे प्रतिनिधी मयुर मारूती नात्ती यांचे बहुमोल सहकार्य लाभले आणि भापट ग्रामस्थ व महिला यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मयुर नात्ती यांनी केले. स्वागत अध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी केले. आभार व सुत्रसंचलन जयसिंग बेटकर सर यांनी केले.

# पाली बस स्थानक नुतनीकरण व इमारत पुनर्बांधणीला मुहूर्त मिळेना



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील जीर्ण आणि जर्जर झालेल्या बस स्थानकाची इमारत जवळपास वर्षभरापूर्वी पाडण्यात आली आहे. मात्र त्या ठिकाणी नवीन इमारतीच्या पुनर्बांधणीस व नूतनीकरणास अजूनही सुरुवात झालेली नाही. येथे जणूकाही खंडर झाले आहे. इमारत बांधणी व व स्थानकात नुतनीकरण कामांसाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. मात्र ठेकेदाराला चालु वाढीव दर हवे असल्याने काम खोळंबले आहे. अशी माहिती सूत्रांनी दिली.

स्थानकाची जुनी इमारत पाडली खरी मात्र जुन्या इमारतीचा राडारोडा येथे तसाच ठेवण्यात आलेला आहे. बाजूला तात्पुरता स्वरूपात प्रवाशी व कर्मचारी शेड बांधण्यात आली आहे. मात्र परिपूर्ण बस स्थानक इमारती अभावी प्रवासी व परिवहन कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे. अनेक वर्षे धोकादायक स्थितीतल्या बस स्थानकाची इमारत तोडून त्याठिकाणी नवीन इमारत उभी रहावी यासाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून वारंवार राज्य परिवहन महामंडळाकडे मागणी करण्यात येत होती. यासाठी सामाजिक कार्यकर्ते, नागरिकांकडून उपोषणे व आंदोलने देखील करण्यात आली. २०१६ मध्ये रिपाइं रायगड जिल्हा सचिव रवींद्रनाथ यांनी नवीन बस स्थानकाकरिता आमरण उपोषण केले.

यावेळी त्यांच्या उपोषणाला व नागरिकांच्या मागणीला यश आले आणि पाली बस स्थानकाच्या नवीन इमारतीकरिता राज्य परिवहन महामंडळाकडून निधी उपलब्ध करण्यात आला. परंतु काही वर्षे जाऊन सुद्धा परिवहन महामंडळाकडून बस स्थानकाच्या पुनर्बांधणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. दरम्यान रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी पुन्हा मागील वर्षी मार्च महिन्यात पाच दिवस उपोषण केल्यानंतर नवीन इमारत बांधण्यासाठी परिवहन महामंडळाकडून बस स्थानकाची धोकादायक इमारत जमीनदोस्त करण्यात आली. परंतु वर्ष उलटून गेले तरी परिवहन महामंडळ नवीन इमारतीच्या पुनर्बांधणी कडे कानाडोळा करतांना दिसत आहे.

# पाले येथे सरकार सेवा केंद्र व सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या पॉईंटचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील पाले गावात भारत सरकारचे कॉमन सर्विस सेंटर व महाराष्ट्र शासनाचे आपले सरकार सेवा केंद्र तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या बीसी पॉईंटचे उदघाटन उरण नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सायली म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उरण नगरपरिषदेच्या नगरसेविका संपूर्णा थळी, हास्य सम्राट संजीवन म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, निवृत्त सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पोसुराम म्हात्रे, निवृत्त शिक्षक विष्णू म्हात्रे, पाले गाव अध्यक्ष अमित म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

तळागाळातील नागरिकांना शासनाच्या सर्व सेवा सुविधा तात्काळ मिळाव्यात म्हणूनच या सेंटरची स्थापना करण्यात आली असे केंद्र प्रमुख व सामाजिक कार्यकर्त्या स्मिता म्हात्रे यांनी संबंधितांना माहिती देताना सांगितले. यावेळी गावातील होतकरू तरुण घरची गरीब परिस्थिती असतांना सुद्धा इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतलेले रोहित म्हात्रे व ऋषिकेश म्हात्रे यांचा नगराध्यक्षा सायली म्हात्रे कडून सत्कार करण्यात आला. यावेळी रुपाली म्हात्रे, कामिनी म्हात्रे, संगीता म्हात्रे, दर्शना म्हात्रे, रविना म्हात्रे, राजेश म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, संदीप म्हात्रे, चंद्रकांत म्हात्रे, शेखर म्हात्रे, धनेश्वर म्हात्रे, हिरामण म्हात्रे, रामदास म्हात्रे, पांडुरंग म्हात्रे, प्रितम म्हात्रे पाले गाव ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेलच्या सराफा बाजारातील नव्या रूपातलं मारुती मंदिर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील जोशी आळीतील आणि आताच्या सराफा बाजारातील शेकडो वर्षांपूर्वीचे असलेले मारुती मंदिर प्रसिद्ध नगरसेवक राजू सोनी यांच्या पुढाकाराने नव्या रूपात बांधण्यात आले आहे.

हरी लक्ष्मण जोशी यांच्या मालकीच्या असलेल्या या मारुती मंदिरात उत्तराभिमुखी वरद मारुतीची मूर्ती मंदिरामध्ये आहे. जोशी यांच्या पूर्वजांनी हे मंदिर बांधले आहे. हे मंदिर नव्याने बांधावे म्हणून नगर–सेवक राजू सोनी यांनी जोशी यांच्याकडे परवानगी मागितली. याप्रमाणे जोशी यांनी



परवानगी दिल्यानंतर तात्काळ राजू सोनी यांनी या मंदिराचे काम सुरू केले. भक्तांचे श्रद्धास्थान असलेलं हे मारुती मंदिर नव्या रुपात तयार झाल्याने भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यावेळी बोल–ताना नगरसेवक राजू सोनी म्हणाले , खूप दिवसापासून माझी इच्छा होती की हे मंदिर नव्याने बांधावे. त्याप्रमाणे आज हे मंदिर बांधले आहे. पनवेल आणि परिसरातील अनेक भक्त या मारुती मंदिरात येतात. मनोभावे मागितलेले अनेकांच्या पूर्णत्वास आले आहे, अशा अनेक आख्यायिका आहेत. त्यामुळे माझ्या हातून हे कार्य झालं त्याचा मला आनंद आहे असे सोनी यांनी सांगितले.

# कातकरी उत्थान अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रमात आदिवासींना जातीचे दाखले वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांचे निर्देशान्वये कातकरी उत्थान अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रमामध्ये पनवेल तालुक्यामधील १ हजार ८५० कातकरी जातीचे दाखले तयार करण्यात आले. त्याचे वाटप उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्याचे हस्ते आखाडावाडी, कल्ले, तालुका पनवेल येथून सुरवात करण्यात आली . यावेली तहसीलदार विजय तळेकर यांच्यासह तलाठी, मंडळ अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

आदिवासी बांधवांचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थर उंचावण्याच्या दृष्टीने विविधांगी लोकाभिमुख व जनकल्याणकारी शासन योजना तळागळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची प्रक्रीया कातकरी उत्थान अभियाना अंतर्गत सुरु आहे. कातकरी लोकांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा यासाठी कातकरी उत्थान योजना ही योजना आणली आहे. या योजनेमुळे कातकरी समाजाला शासकीय योजनांचा प्रत्यक्ष तत्काळ लाभ मिळणार आहे.

भविष्यात शासन योजनेअंतर्गत विशेष प्रयत्न केले जाणार असून स्थानिक रोजगार निर्मितीवर भर दिला जाणार आहे असे उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांनी सांगितले. कातकरी उत्थान अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रमात पनवेल तालुक्यामधील १ हजार ८५० कातकरी जातीचे दाखले तयार करण्यात आले त्याचे वाटप करण्यात आले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सुचना देण्यात येते की, मे.विनायक इंटरप्रायझेस तर्फे भागीदार १) श्री.राजेश मारुती मढवी २) श्री.मनीलाल भानजी पटेल, पत्ता : १०८, शिवप्रेरणा अपार्टमेंट, सदनिका क्र.१०१, पहिला मजला, बेलापूर, सेक्टर २९, नवी मुंबई यांना फाईल नं.२, येथील काळुंद्रे, प्लॉट नं.१४४ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला असून हस्तांतरण झाले आहे. तसेच वर नमूद शेतकऱ्यांकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल अंकिता गणेश मुकादम राहणार : शिरढोण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक २ काळुंद्रे नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| काळुंद्रे | काळुंद्रे | १४४ | ९९.९६ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वंध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्या मिळकतींसमोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे अशिल हे सदरची मिळकत कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नाव | गट क्रं. उपविभाग क्रं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) श्री.हिरालाल शामजी रंगानी उर्फ पटेल २) श्री.जिग्नेश हरीलाल पटेल | ५८/२/४/५/ब | ०–२७–२० पो.ख. ०–०४–८० ०–३२–०० | ४.८० |

सदर मिळकत निर्वेध असल्याची वर नमूद विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीस, दावा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबधं असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१७/२/२०२२

**सही/–**
**एन.ए.शेख**
**वकील व नोटरी**
**शॉप नं.२४, अमन सोसायटी,**
**सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई**
**मो.नं.९९२०९९६९०९**


# आज किल्ला येथे विकासकामांचे भूमीपूजन सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील किल्ला ग्रा.पंचायत हद्दीतील अशोक नगर येथे आज शुक्र. दि.१७ फेब्रुवारी रोजी स.१० वा. जल जीवन नळ पाणीपुरवठा व समाज कल्याण विशेष घटक अंतर्गत जल शुद्धीकरण बसविणे व गाव अंतर्गत गटारात बांधणे आदी विकास कामांचे भूमीपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कोकणचे भाग्यविधाते खा.सुनील तटकरे यांच्या आशिर्वादाने व रा.जि.पालकमंत्री तथा राज्यमंत्री आदिती तटकरे व विधान परिषदेचे आ.अधिकेत तटकरे यांच्या शुभहस्ते संपन्न होणाऱ्या या कार्यक्रम प्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस जि.कार्याध्यक्ष मधुकर पाटील, राज्य सरचिटणीस विजय पवार, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, जि.सरचिटणीस सुरेश मगर, जि.उपाध्यक्ष शंकर भगत, पं.स.सदस्या विजया पाशिलकर, तालुका उपाध्यक्ष अनिल भगत, जेष्ठ नेते प्रदीप बामुगडे, धाटाव उपसरपंच यशवंत रटाटे, विभागिय अध्यक्ष दत्ता चव्हाण, जेष्ठ नेते अप्पा देशमुख, रोहिदास पाशिलकर, तालुका युवक अध्यक्ष जयवंत मुंढे, प्रितम पाटील, माजी सरपंच विजय दळवी, युवा नेते महेश बामुगडे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून यावेळी किल्ला पाणी पुरवठा अध्यक्ष यशवंत कडव, उपाध्यक्ष शिवाजी रटाटे, सेक्रेटरी जितेंद्र पालकर, गाव कमिटी अध्यक्ष संदीप पालकर, उपाध्यक्ष अशोक चांदोरकर, खजिनदार विनोद चांदोरकर, सल्लागार दिलिप पाबरेकर, संजय पालकर, पांडूरंग पाबरेकर, तंटामुक्त समिती अधँयक्ष महादेव बामुगडे आदींची उपस्थिती लाभणार आहे.

# भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश प्रकोष्ठकडून बेटी बचाओ - बेटी पढाओ ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

राज्यस्तरीय वत्तृफ्त्व स्पर्धेचे आयोजन भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश प्रकोष्ठकडून करण्यात आले असून प्रदेश संयोजक डॉ.शुभा पाध्ये यांच्या नेतृत्वाखाली सदर स्पर्धेची घोषणा झाली आहे. या स्पर्धे चा उद्देश युवा वर्गात 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानाविषयी जागृती निर्माण करणे हा आहे. या स्पर्धेतून अनेक उत्तम वक्तृत्व असणाऱ्या व समाजापुढील प्रश्नांवर विचारमंथन करण्यास इच्छुक असणाऱ्या युवक युवतींना आपले विचार निर्भीडपणे मांडण्यासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध केलेले आहे.

जिल्हा संयोजक दक्षिण रायगड श्रीमती निलिमा राजेय भोसले यांनी या स्पर्धेत रायगडातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा असे आवाहन केले आहे. प्रथम पारितोषिक रू.२१,हजार, द्वितीय पारितोषिक रू.११ हजार, तृतीय पारितोषिक रू.७ हजार तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकेही दिली जाणार आहेत.

स्पर्धेचे विषय १)आजची पिढी, तंत्रस्नेही पिढी. २)विचार मंथन–लग्नाचे वय २१. ३)सृजनकर्ती मी,तरी अजूनही असुरक्षित मी. ४)भारतीय स्त्री,आत्मनिर्भर स्त्री. ५)मुलगी देशाची शान,प्रत्येक घराचा सम्मान असे असून १६ ते २५ वर्षे वयोगटातील मुले–मुलींसाठी असलेली ही खुली स्पर्धा आहे. स्पर्धेसाठी भाषा माध्यम मराठी,हिंदी,इंग्रजी पैकी एक निवडायचे असून स्पर्धा कालावधी २४ जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२२ पर्यंत आहे. यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग ३ ते ५ मिनिटांचे असावे तर व्हिडिओ साईज ५० ते ६० मेगाबाईटस्पेक्षा जास्त नसावी. स्पर्धकाचे नाव, जन्म तारीख,संपर्क क्रमांक, राहता पूर्ण पत्ता तसेच स्पर्धकाचे आधारकार्ड अशी माहिती जोडायची आहे.सदर व्हिडिओ आणि माहिती फक्त ईमेलद्वारे पाठवायचे असून अधिक माहितीसाठी श्रीमती निलिमा राजय भोसले– ९१३००१६९६७ आणि अतुल प्रजापती– ९८३३२९६६२२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन सपना सचिन बुटाला यांनी केले आहे.


मा.मुजावर साहेब

वकील मनोज वारंगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०४/२०२२

1) ATINDRA ATUL BOSE
2) RITA ATINDRA BOSE
Both are residing at-Matru Chaya,
1st Floor, 49 B, D.K.Sandu marg,
Chembur 400071 Applicant

अर्जदार क्र.१ आणि २ यांची मुलगी मयत कै.MONA ATINDRA BOSE राहणार मातृ छाया, पहिला मजला, ४९ बी, डी.के.संदु मार्ग, चेंबुर ४०००७१ यांचे दि.०१/१२/२०२१ रोजी चेंबुर येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :–

SCHEDULE OF PROPERTY
Flat No.403, Fourth Floor, Building Known As Melody, Admesuring About 72.95 Sq.mtrs., Build Up, Constructed on Bearing Plot No.11 & 12, Sector-6, Kharghar, Navi Mumbai, Tal-Panvel, Dist-Raigad.
Valued at Rs. 37,41,250/-

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.एम.एम.राव साहेब

वकील मनोज वारंगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/३/२०२२

2) HANIFA AYYUB DABIR
1) AIJAZ AYYUB DABIR
3) SHAMS AYYUB DABIR
4) UBED AYYUB DABIR
5) IRAM AYYUB DABIR
6) NAGMA DABIR
All are Residing at Post Umberghar Mohalla,
Taluka-Dapoli, Umberghar, Dist-Ratnagiri Applicants

अर्जदार क्र.२ यांचे पती आणि अर्जदार क्र.१, ३, ४, ५ व ६ यांचे वडील मयत कै.श्री.अय्युब जमालुद्दीन डबीर राहणार रुम नं.३०४, बिल्डींग नं.०३, शैलेश नगर, मुंब्रा, ठाणे यांचे दि.२७/०४/२०२१ रोजी बिलाल हॉस्पिटल, ठाणे येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :–

SCHEDULE OF PROPERTY
Flat No.302, A-Wing,
On the Third Floor of the building known as Eden Park, Admeasuring 25.422 Sq.Mtrs. Carpet area, cupboard 1.710 Sq.Mtrs., Enclosed balcony 3.455 Sq.Mtrs., flower bed of 2.550 Sq.Mtrs. & 3.577 Sq.Mtrs. terrace, Laying being and situated at Plot No.24 & 25, Sector 11, Village-Taloja, Taluka-Panvel, Dist-Raigad, Navi Mumbai
Value at Rs.22,50,000/-

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मुजावर सो

वकील : एन.एस.साळुंखे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.१९०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.४/४/२०२२

१) श्रीमती.लीला आत्माराम पाटील
वय : ६२ वर्षे, भारतीय नागरिक
२) श्री.रत्नदिप आत्माराम पाटील
वय : ४० वर्षे, भारतीय नागरिक
३) श्री.धनेश आत्माराम पाटील
वय : ३६ वर्षे, भारतीय नागरिक
सर्व रा.रुम नं.५०१, सी विंग, कृष्णा टॉवर,
प्लॉट नं.८/८ ए, सेक्टर–९, खांदा कॉलनी
रेल्वे क्रॉसिंग जवळ, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प)
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.आत्माराम रामभाऊ पाटील हे खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प) येथील कायमस्वरुपी रहिवासी होते. त्यांचा मृत्यू दि.१६/०६/२०२० रोजी मौजे : कळंबुसरे, पो.चिरनेर, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाल्याने अर्जदार यांनी कै. आत्माराम रामभाऊ पाटील यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसपत्र मिळणेकामी अर्ज केला आहे.

परिशिष्ट 'अ' मिळकतीचे वर्णन

सदनिका क्र.५०१, सी–विंग, कृष्णा टॉवर, प्लॉट नं.८/८ ए, सेक्टर–९, खांदा कॉलनी रेल्वे क्रॉसिंग जवळ, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६. एकूण क्षेत्रफळ ४३.७१ चौ.मी. बांधीव आणि ७.६२ चौ.मी. टेरेस.

वरील अर्जदार क्र.१ श्रीमती.लीला आत्माराम पाटील (पत्नी), अर्जदार क्र.२ श्री.रत्नदिप आत्माराम पाटील (मुलगा) व अर्जदार क्र.३ श्री.धनेश आत्माराम पाटील (मुलगा) हे कै.आत्माम रामभाऊ पाटील ह्यांचे कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत. तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते १) श्रीमती.लीला आत्माराम पाटील, अर्जदार क्र.२ श्री.रत्नदिप आत्माराम पाटील व अर्जदार क्र.३ श्री.धनेश आत्माराम पाटील यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत हे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## कामोठेतील समस्या सोडवण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे नोडचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन कामोठेतील समस्या सोड्विण्याची मागणी संतोष जानू चिखलकर, उपाध्यक्ष-पनवेल जिल्हा काँग्रेस कमीटी यांच्यातर्फे करण्यात आली आहे.

सेक्टर ६ ते १० मधील वाहणाऱ्या गटारांची त्वरित कारवाई करण्यासोबत नवीन गटार लाईन टाकण्याचा प्रस्ताव पास करणे, सेक्टर १८ मधील सिडकोचा राखीव प्लॉट आहे त्याची साफसफाई करून नागरिकांना मॉर्निंग वॉल्क तसेच इतर शारिरिक व्यायामासाठी उपलब्ध करून देणे, सेक्टर ३६ मधील प्लॉट्स क्रमांक ४१, ४२, सत्यकुंज सोसायटी समोरील पुथपाथ खालील गटार लाईन दुरुस्थ करण्याबाबत गेली २ वर्ष सोसायच्या वतीने पाठपुरावा करण्यात येत आहे

त्याबाबतीत लक्ष देऊन काम त्वरित सुरु करणे, कामोठे नोड मधील डांबरीकरणाचे काम जोरात सुरु आहे तेव्हा प्रत्येक सेक्टर मधील प्रत्येक प्लॉट्स समोरील डांबरीकरण झालेच पाहिजे या कामोठे शहरातील समस्या बाबत रीतसर चर्चा करण्यात करून त्याबाबत लवकरात लवकर उपायोजना करण्याची विनंती करण्यात आली. यावेळी कामोठे शहरातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील पोपट आवारी, रवींद्र जाधव, प्रमोद पेंडुरकर, काकासाहेब पवार मान्यवर उपस्थित होते.

## मांडला ग्रामपंचायतीत संत रोहिदास जयंती निमित्ताने प्रतिमेचे अनावरण

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मांडला ग्रामपंचायतीत संत रोहिदास जयंती निमित्ताने संत रोहिदास यांच्या प्रतिमेचे अनावरण चर्मकार संघटनेचे तालुकाध्यक्ष सुरेश नांदगावकर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मुरूड चर्मकार संघटनेचे तालुकाध्यक्ष सुरेश नांदगावकर ,रोहिदास उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर महाडिक उपाध्यक्ष संदीप नागावकर सचिव प्रफुल रोहेकर, गणेश पालकर ,विजय रोहेकर तंटामुक्ती अध्यक्ष दत्तात्रय नागावकर रवींद्र पालकर,ग्रामपंचायत सरपंच सुचिता पालवणकर मॅडम, उपसरपंच राजेश पाटील ग्रामपंचायत सदस्य धर्मेंद्र. गायकवाड अनिता नांदगावकर बशीर गोरमें माजी सरपंच शैलेश रातवडकर सामाजिक कार्यकर्ते सुरेश पालवणकर रोहिदास उत्कर्ष मंडळाचे कार्यकर्ते व बारवई गावचे अध्यक्ष परशुराम मुरुडकर, उपाध्यक्ष पांडुरंग घोसाळकर बारावी गावचे ग्रामस्थ आदी. मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाली नगरपंचायत स्वीकृत नगरसेवकपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधाकर मोरे व शेकापचे सुमेध खैरे



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील प्रतिष्ठेच्या पाली नगरपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व शेकाप आघाडीची एकहाती सत्ता आली आहे. पाली तहसील कार्यालयातील हिरकणी कक्षात संपन्न झालेल्या पाली नगर पंचायतीच्या पहिल्या विशेष सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधाकर मोरे व शेकापचे सुमेध खैरे यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली आहे.

पाली नगरपंचायतीच्या पहिल्या नगराध्यक्ष होण्याचा मान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गीता पालरेचा यांना मिळाला आहे. तर उपनगराध्यक्ष पदी शेकापचे आरिफ मणियार यांची निवड झाली आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस व शेकापचे स्वीकृत नगर-सेवक झाल्याने आघाडीची ताकद वाढली आहे. पाली नगरपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ६, शेकापचे ४, शिवसेना ४, भाजप २ व अपक्ष १ असे एकूण १७ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे एका स्वीकृत नगराध्यक्ष निवडीसाठी शेकाप व शिवसेनेचे समसमान नगरसेवक असल्याने चुरस होती. मात्र एका अपक्ष नगरसेवकाने शेकापला पाठींबा दिल्याने शेकापचे पारडे जड झाले आणि शेकापला स्वीकृत नगरसेवक पद मिळाले. यावेळी नगराध्यक्षा गीता पालरेचा, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, जिप सदस्य सुरेश खैरे, ग. रा. म्हात्रे सर्व नगरसेवक, उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी अंगाई साळुंखे, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. स्वीकृत नगरसेवक पद मिळावे यासाठी दोन्ही पक्षातील सच्चे व निष्ठावान कार्यकर्ते तर काही पराभूत उमेदवार इच्छुक होते. मात्र त्यांचा हिरमोड झाला. स्वीकृत नगरसेवकांची निवड झाल्यावर फटाके फोडून घोषणा देत जल्लोष करण्यात आला.

# माथेरान राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने स्वच्छता मोहीम

**दै.रायगड नगरी । माथेरान**

स्वच्छता कितीही केली तरीसुद्धा अनेकदा लोकांची स्वतःहून स्वच्छतेच्या बाबतीत मानसिकता नसल्याने त्या त्या परिसरात नेहमीच घाणीचे साम्राज्य दिसुन येते. घराची ओस अंगण सांगते त्याप्रमाणे ज्या ज्या प्रभागात काहीअंशी का होईना ओल्या सुक्या कचऱ्याचे साठे घरालगत असणाऱ्या नाल्यात, गटारात अथवा ओढ्यात दिसून येतात त्यामुळेच अनेकदा यातूनच आजार आणि रोगाचा प्रादुर्भाव जाणवतो.



नगरपरिषदेच्या माध्यमातून जरी नेहमीच कचरा गोळा करण्यासाठी ठेकेदारांची माणसे येत असली तरी सुद्धा प्रत्येक ठिकाणी प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या बाटल्या अथवा अन्य कचरा हा अनेकदा गटारात टाकला जातो. मागील काळात ज्याप्रमाणे गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत त्याचप्रमाणे गावातील प्रत्येक प्रभागात सुध्दा अशाप्रकारे कॅमेरे लावून कचरा टाकणाऱ्या लोकांवर दंडात्मक कारवाई केल्यास नक्कीच याला आळा बसू शकतो.

गाव स्वच्छ असेल तर येणाऱ्या पर्यटकांना एक सुंदर संदेश यानिमित्ताने जाऊ शकतो. रायगड जिल्ह्यातील माथेरान हे सुंदर पर्यटनस्थळ असून केवळ पर्यटकांवर अधोरेखित इथले व्यवसाय आहेत. शासन दरवर्षी स्वच्छता अभियान राबवित असते.याच स्वच्छता मोहिमेतून गावाची प्रगती दिसून येते. इथल्या नागरिकांची स्वच्छते बाबतीत मानसिकता लक्षात येते. नगरपरिषदेच्या माध्यमातून स्वच्छता राखली जात आहे. प्लास्टिक मुक्त माथेरान होत आहे. नगरपरिषदेच्या विद्यमान मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक सुरेखा भणगे-शिंदे यांनी सुध्दा हे गाव स्वच्छता बाबतीत अग्रेसर अस-ावे यासाठी प्रयत्न करीत आहेत.पर्यटन वाढीसाठी स्वच्छता ही असली पाहिजे तेव्हाच खऱ्या अर्थाने इथे पर्यटकांची संख्या वाढेल ही बाब लक्षात घेऊन येथील राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून दि.१७ फेब्रुवारी रोजी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. वाल्मीकी नगर आणि पंचशील नगर या भागातील कचरा गोळा करण्यासाठी काँग्रेसच्या नेत्यांसह अन्य पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ,विविध मंडळाच्या, समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सुध्दा स्वेच्छेने या मोहिमेत पुढाकार घेऊन गटारात उतरून जवळपास पंचवीस गोणी कचरा गोळा केला आहे.

माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, संतोष लखन, काँग्रेसचे उपाध्यक्ष शुभम गायकवाड, मुकेश शहा, नितीन शहा, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे, अमोल चौगुले, अनिकेत बनसोडे, बिलाल महापुळे, केतन रामाणे, पप्पू खान, शबाब कुरेशी, शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस शफीक शेख, काँग्रेस पक्षाच्या महिला अध्यक्षा वर्षा शिंदे,उपाध्यक्षा सुहासिनी दाभेकर यांसह असंख्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# सकल मराठा समाज रायगड यांची पेण येथे तातडीची बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यासाठी छत्रपती संभाजीराजे स्वतः २६ तारखेला आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण करण्यासाठी बसणार आहेत.

आपल्या रायगड जिल्ह्यातून जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्यासाठी तयारी करण्यासाठी रायगड जिल्ह्याची बैठक रविवारी दि २० फेब्रुवारी सकाळी ११ वाजता मराठा समाज हॉल ( पेण खोपोली बायपास रोड आंबेगाव )पेण येथे होणार आहे.

तरी प्रत्येक तालुक्यातील प्रमुख ५/६ समन्वयक हजर रहावे असे आवाहन सकल मराठा समाजाचे समन्वयक विनोद साबळे यांनी केले आहे.


श्री.मुजावर सो

अ‍ॅड.शशिकांत काळू म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०८/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.४/०४/२०२२

१) श्रीमती.रत्ना हनुमंत खटकर
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.रुम नं.१२०, हनुमान खटकर चाळ, से.४ ए,
हनुमान मंदिर जवळ, आसुडगाव, पो.कळंबोली,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
२) सौ.रेखा जगदीश खुटले
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.घर नं.६६, वरची आळी, नांदगांव,
पो.पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.राखी सुरज पाटील
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
४) कु.रोशनी हनुमंत खटकर
वय : २७ वर्षे, धंदा : शिक्षण
५) कु.रोशन हनुमंत खटकर
वय : २५ वर्षे, धंदा : वकील
६) कु.रोहन हनुमंत खटकर
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
३ ते ६ रा.रुम नं.१२०, हनुमान खटकर चाळ,
से.४ ए, हनुमान मंदिराजवळ, आसुडगाव,
पो.कळंबोली, तालुका : पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ६ हे कै.हनुमंत महादेव खटकर यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ६ यांचे वडील कै.हनुमंत महादेव खटकर हे दि.३१/०७/२०२१ रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची आई कै.धर्मुबाई महादेव खटकर ह्या दि.२१/०५/१९९७ रोजी मौजे : आसुडगाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत.

अर्जदार नं.१ ते ६ हेच कै.हनुमंत महादेव खटकर यांचे वारसदार आहेत तसेच अर्जदार नं.१ ते ६ यांच्याशिवाय कै.हनुमंत महादेव खटकर यांस आणखी कोणीही वारसदार नाहीत.

कै.हनुमंत महादेव खटकर यांचे आईच्या म्हणजेच कै.धर्मुबाई महादेव खटकर यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**
**मौजे : आसुडगाव, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| आसुडगाव | २३/३७ (२१) | ५ | - | ०-०८-६ |
| | | ७ | १४ | ०-३८-९ |
| कळंबोली | १०५ | ९६ | १-B | ०-३३-९ |
| | | १०० | - | ०-३४-० |
| | | १०१ | १ | १-७५-० |
| | | १०६ | ८ | ०-२४-९ |

**मिळकतीचे वर्णन (ब)**
**मौजे : आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.हनुमंत महादेव खटकर यांचे स्वकष्टार्जित व मालकीची तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे : आसुडगाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड नवी मुंबई येथील खालील वर्णनाच्या घर मिळकती आहेत.

| अ.क्र. | मौजे | घर क्र. | क्षेत्र चौ.फुट/चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | आसुडगाव | १८८ | ५३६.५० |
| २ | आसुडगाव | २७६ | ७४१ |

**मिळकतीचे वर्णन (क)**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.हनुमंत महादेव खटकर यांचे स्वकष्टार्जित व मालकीची तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे : कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, नवी मुंबई येथील खालील वर्णनाचा सदनिका व वाणिज्य गाळे / शॉप मिळकत आहे.

| अ.क्र. | मौजे | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र चौ.फुट |
|---|---|---|---|
| १ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-१०१, पहिला मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५९० |
| २ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-३०१, तिसरा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५९० |
| ३ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-५०१, पाचवा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५९० |
| ४ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-२०३, दुसरा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५८५ |
| ५ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-३०३, तिसरा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५८५ |
| ६ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-५०३, पाचवा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५८५ |
| ७ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-१०५, पहिला मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ७१० |
| ८ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-२०१, दुसरा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५९० |
| ९ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-४०१, चौथा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५९० |
| १० | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-४०३, चौथा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५८५ |
| ११ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-३०४, तिसरा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ६३५ |
| १२ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-५०४, पाचवा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ६३५ |
| १३ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.बी-५०२, पाचवा मजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ५४५ |
| १४ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | शॉप क्र.७, तळमजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | ३१० |
| १५ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | शॉप क्र.८, तळमजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | २३५ |
| १६ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | शॉप क्र.९, तळमजला, गंगा गॅलेक्सी, से.२२, प्लॉट नं.८० व ८१ | २४० |

कै.हनुमंत महादेव खटकर यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.हनुमंत महादेव खटकर यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १७/०२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल


# १०० कोटींचे कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून केली वीस लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शंभर कोटी रुपयांचे कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून वीस लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

खारघर, सेक्टर १२ येथील देवेंद्र डुकरे यांची नव्हीटार रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड या नावाची कंपनी आहे. ही कंपनी सौरऊर्जा प्रकल्प राबवून सौर वीज उत्पादन करण्याचे काम करते. त्यांना हैदर अब्बास याने सौर ऊर्जा प्रकल्पकरता दुबई येथून शंभर कोटी रुपयांचे कर्ज मिळवून देतो असे सांगितले. त्यावेळी खर्च म्हणून पाच टक्के रक्कम पाच कोटी रुपये कमिशन म्हणून मागितली. यावेळी हैदर अबास हे डुकरे यांना मार्च २०१९ मध्ये दुबई येथे घेऊन गेले. यावेळी फायनान्सर मसूद अल आवार हे लंडन या ठिकाणी गेले असल्याने त्यांची भेट होऊ शकली नाही. त्यामुळे हैदरने फीरास अल ईसरावी या इसमाशी दुबई येथे भेट करून दिली. व तो फायनान्सर मसुदचा सहकारी असल्याचे सांगितले. ते भारतात परत आल्यानंतर त्यांनी नोटराईज करार केला.

यावेळी हैदरला वीस लाख रुपये ट्रान्सफर केले. मात्र दुबई येथून कोणताही आर्थिक पुरवठा झाला नाही. याबाबत विचारणा केली असता लवकरच पैसे देतो असे सांगून हैदरने रक्कम क्सिस बँकेत ट्रान्सफर झाल्याबाबतची कागदपत्रे दाखवली. यावेळी डुकरे यांनी सदरची कागदपत्त्रांची आयसीआयसीआय बँकेत जाऊन पडतळणी केली असता ती कागदपत्रे बनावट असल्याचे दिसून आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच आरोपी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# आदित्य दृष्टी सामाजिक विकास प्रतिष्ठान मार्फत अन्नदान

**दै.रायगड नगरी । कर्जत**



ग्रुप ग्रामपंचायत वदप मधील कुशीवली येथे आदिवासी बांधवांना आदित्य दृष्टी सामाजिक विकास प्रतिष्ठान मार्फत अन्नदान करण्यात आले.

कुशीवली येथे आदित्य दृष्टी सामाजिक विकास प्रतिष्ठान संस्थापक कॅप्टन अंशु अभिषेक यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून आदिवासी बांधवांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या विशेष कार्यक्रमासाठी अध्यक्षा सुधा सिंह, कर्जत नगर परिषद नगरसेवक उमेश गायकवाड, युवासेना कर्जत तालुका सचिव ॲड.संपत पांडुरंग हडप, कानसा वारणा फाउंडेशन अध्यक्ष दीपक दादा पाटिल, जगदीश दगडे, मुबारक शेख, सुनील पाटील, अनंत गायकवाड, रफ्तक शेख, भरत आदिल ,बाकेलाल यादव, शीला शर्मा, प्रदन्या वाघमारे, सुवर्णा चव्हाण, त्याच बरोबर ग्रुप ग्रामपंचायत सरपंच नीरा विचारे, उपसरपंच लीलाधर वाघमारे, गजानन वाघमारे, लीलाधर गायकवाड, कैलास राजेशिर्के, अनंत वाघमारे, गणपत वाघमारे, दिनेश गायकवाड, हे उपस्थित होते.

कॅप्टन अंशु अभिषेक संस्थापक आदित्य दृष्टी सामाजिक विकास प्रतिष्ठान संस्थेचा मुख्य उद्देश सामाजिक व धार्मिक कार्य करणे हा असून बाळ आश्रमाचे बांधकाम (विनामूल्य शिक्षण व वसतिगृहाची व्यवस्था), बेरोजगार, गरीब, असहाय्य महिलांना प्रशिक्षित करून लघुउद्योगाद्वारे रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. कर्जत तालुक्यातील विविध ग्रामपंचायत विभागात ते यासाठी प्रशिक्षण शिबीर घेत असून सर्वा महिलांना आपल्या पायावर खंबीरपणे उभे करण्याचे महत्वपूर्ण काम सध्या या संस्थेच्या मार्फत सुरू आहे.

# बंद स्वरुपातील स्ट्रिट लाईट बद्दल शिवसेनेने विचारला सिडकोला जाब



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल परिसरातील अनेक ठिकाणी बंद स्वरुपातील स्ट्रिट लाईट बाबत आज सिडको कार्यालयात जावून शिवसेनेने जाब विच-ारुन तातडीने बंद असलेले स्ट्रिट लाईट चालू करण्याची मागणी केली.

नविन पनवेल शहरातील सेक्टर - ५ येथील उघड्या स्वरूपातील नाल्यावर झाकण टाकणे तसेच शहरातील सेक्टर २,३,४ व ५ या भागातील बंद स्वरूपातील स्ट्रीट लाईट चालू करणे संदर्भात आज मोहिले ( सिडको अधिक्षक अभियंता नविन पनवेल ) यांना नविन पनवेल शिवसेना शहराच्या वतीने निवेदन देण्यास आले. यावेळी नविन पनवेल शहर प्रमुख यतिन देशमुख, शहर संघटिका सौ.अपूर्वा प्रभू, उपशहर संघटिका सुगंधा शिंदे, विभाग प्रमुख किरण सोनावणे , उपविभाग प्रमुख राजेश वैगणकर, अविनाश गव्हाणकर, शाखा प्रमुख शाम खडकबन, सिद्धेश गुरव, संदेश वाघमारे, तुषार चौधरी उपस्थित होते. सदर नागरी सुविधा त्वरित दुरुस्त करून द्याव्यात अन्यथा शिवसेना आपल्या पद्धतीने जाब विचारेल असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

# मराठी राजभाषा दिनानिमित्त दिवाळी अंक स्पर्धा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुंबई वृत्तपत्र लेखक संघ आणि केदारनाथ विद्या प्रसारिणी संचालित ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा दिनानिमित्ताने कुर्ला, मुंबई येथे दिवाळी अंक प्रदर्शन व स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा विनामूल्य असून स्पर्धे करिता इच्छूकांनी एक दिवाळी अंक टपाल किंवा कुरिअर द्वारा श्री.संजय साळगांवकर,श्रीराम सोसायटी,विंग सी.१,रुम नं.१०,पहिला मजला, कामगार नगर, कुर्ला पूर्व, मुंबई-४०००२४, संपर्क : ९७०२२४८२७५, ई-मेल- savlispmgmail.com या पत्त्यावर बुधवार दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८.०० वा.पर्यंत पाठवावेत.

या कार्यक्रमाचे उदघाटक व प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक आमदार मंगेश कुडाळकर आणि केदारनाथ विद्या प्रसारिणी संचालित ग्रंथालय पदाधिकारी, संघाचे खजिनदार डॉ. सुभाष सोनंदकर आदी. मान्यवर उपस्थित राहणार असून समारंभाचे अध्यक्ष ॲड.सुनिल चंद्रकांत सुमती कदम आहेत.

दिवाळी अंक निवड समिती डॉ.खंडु रघ-ुनाथ माळवे (साहित्यिक), संघाचे उपाध्यक्ष व निवड समिती सदस्य जगन्नाथ काशिनाथ पवार, संघाचे महिला सभासद व निवड समिती सदस्या करुणा संजय बारीया आणि निलम सुरेश पाटील आहेत.

स्पर्धेतील तीन विजेत्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.या कार्यक्रमप्रसंगी माजी पदाधिकारी व वरीष्ठ वृत्तपत्र लेखकांचे सन्मान देखील होणार आहेत.कार्यक्रमाचे संयोजक व सुत्रसंचालन लेखक संघाचे सचिव संजय गंगाराम साळगांवकर करणार आहेत.मराठी भाषेचा प्रचार व प्रसाराला बळ देण्यासाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे मराठी वृत्तपत्र लेखक संघाकडून सांगण्यात आले आहे.